# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

***( परीक्षा विभाग )***

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३३५२

जा. क्रं./गों.वि./परीक्षा विभाग/2902/२०१७ दि. १८/०८/२०१७

# परिपत्रक

(नामांकन सत्र २०१७–१८)

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत सर्व **( D.T.E.) तांत्रीक शिक्षण संचालनालय,महाराष्ट** (B.E., B.Pharm, M.B.A., M.C.A., M.Tech ) विद्याशाखा अंतर्गत असलेल्या महाविद्यालयांना कळविण्यात येते की, **शैक्षणिक सत्र** २०१७–१८ च्या प्रवेश प्रक्रीयेची कार्यवाही सुरू झालेली असुन महाविद्यालयांना नामांकनाच्या Online प्रक्रीया संदर्भात खालील प्रमाणे महत्वपुर्ण सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

०१) महाविद्यालयामध्ये Online झालेले सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश विद्यापीठाला Online Submit to Registration(Data Upload) करून विद्यार्थ्यांची प्रवेश निश्चीत करणे आवश्यक आहे.

०२) वित्त व लेखा विभागाव्दारे जाहीर केलेल्या सुधारीत परिपत्रक **गों.वि.ग./विद्या/शिशु/७६/२०१७, दि. २९/०४/२०१७, नुसार प्रति विद्यार्थी रू. १२५/– प्रमाणे** नामांकन शुल्क घेण्यात यावे. नामांकन शुल्काचे कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅंकेचे धनाकर्ष (D.D.) हा **" वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली "** गडचिरोली यांचे नावान देय असावा. तसेच धनाकर्ष हा **दि.** ०९/०९/२०१७ पर्यंतचा असावा. तसेच महाविद्यालयाने नामांकन अर्ज जमा करण्यासाठी अतिरिक्त ३ दिवसांचा कालावधी **(दिनांक १३ सप्टेंबर २०१७)** पर्यंत राहील. यानंतर आलेल्या नामांकनासाठी नियमाप्रमाणे **प्रति दिवस प्रति विद्यार्थी रुपये २५/–** प्रमाणे विलंबशुल्क आकारण्यात येईल.

०३) विद्यापीठात नामांकन आवेदनपत्र सादर करतेवेळी महाविद्यालयाने खालील प्रमाणे महत्वाची कागदपत्रे सोबत जोडणे अनिवार्य आहे.

**१. नियमित /कार्यकारी प्राचार्य मान्यता पत्र.**
**२. संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांना स्वाक्षरी प्रदान केलेले असल्याचे पत्र/स्वाक्षरी नमुना.**
**३. वित्त विभागाचे ना देय प्रमाणपत्र.**
**४. विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण पत्र.**
**५. ज्या शैक्षणिक वर्षाचे फॉर्म स्विकाराचे आहे त्या वर्षाचे संलग्निकरण प्रमाणपत्र.**
**६. अभ्यासक्रमाला शासनाने दिलेली मान्यता पत्र.**
**७. महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे प्रमाणपत्र.**
**ज्या महाविद्यालयाने १०% वाढीव प्रवेश घेतलेले आहेत त्या महाविद्यालयाने १०% वाढीव प्रवेश क्षमतेचे मंजुरीपत्र सादर करणे आवश्यक आहे.**
**८. नामांकन आवेदन पत्रासोबत विद्यार्थ्यांचे Eligibility Status Report जोडणे आवश्यक आहे.**

०४) महाविद्यालयाने नामांकन करीत असतांना सदर माहीती Form A,B & Form E,F मध्ये सादर करावे. ही सर्व प्रपत्र **www.unigug.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सोबत Soft Copy (CD) देण्यात यावी.

०५) विद्यार्थ्यांचे नामांकन हे नियोजित वेळेतच झाले पाहीजे. ज्या विद्यार्थ्यांचे नामांकन होणार नाही. त्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदन पत्र संकेतस्थळावर उपलब्ध होणार नाही याची नोंद घ्यावी.

०६) महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे प्रवेश घेतांना त्या विद्यार्थ्यांची सदर अभ्यासक्रमासाठी असलेली आवश्यक शैक्षणिक पात्रता तपासुनच विद्यापीठाच्या निर्देशानुसारच प्रवेश द्यावा. अपात्र असलेल्या विद्यार्थ्याला प्रवेश दिल्यास विद्यापीठाव्दारे कधीही त्यांचे नामांकन रद्द केले जाईल व याची सर्वस्वी जबाबदारी ही त्या संबंधीत महाविद्यालयाची राहील.

०७) ज्या महाविद्यालयांना विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द (Admission Cancel) करावयाचे असेल त्यांनी आपल्या महाविद्यालयांच्या लेटरहेडवर प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह त्या विद्यार्थ्यांचे नाव, अभ्यासक्रम, सेमीस्टर व Online eligibility Form No. लिहुन विद्यापीठात सादर करून तात्काळ प्रवेश रद्द करावे.

०८) बाहेरील विद्यापीठाच्या/बोर्डच्या विद्यार्थ्याचे नामांकन करतेवेळी सदर विद्यार्थ्यांचे स्थलांतरण प्रमाणपत्र व योग्यता प्रमाणपत्र घेऊनच प्रवेश निश्चित करावा. तसेच **गों.वि.ग./विद्या/शिशु/७६/२०१७, दि.२९/०४/२०१७ नुसार** कार्यवाही घेऊन Immigration(प्रवजन) शुल्क व्यावसायीक अभ्यासक्रमाकरीता **रू.२००/—** व अव्यावसायीक अभ्यासक्रमाकरीता **रू. १००/—** भरणे आवश्यक आहे. तसेच **सदर शुल्क रा. तु. म. नागपुर विद्यापीठामधून आलेल्या विद्यार्थ्यांकरीता सुध्दा लागु राहील.**

०९) नामांकन आवेदनपत्र व संलग्नित कागदपत्रे हे बॉक्स फाईलमध्ये विद्यापीठात सादर करावे. आणि मुळ गुणपत्रिका व ईतर प्रमाणपत्र वेगळया फाईलमध्ये विद्यापीठात सादर करावे.

१०) ज्या विद्याशाखेकरीता नियमित मान्यता प्राप्त एकही प्राध्यापक महाविद्यालयात नाही अशा महाविद्यालयातील संबंधीत अभ्यासक्रम/विद्याशाखेतील विद्यार्थ्यांचे प्रवेश क्षमतेच्या **२०%** प्रवेश कमी करून नामांकन करण्यात येईल, करीता अशा महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

११) महाविद्यालयाने प्रवेशित विद्यार्थ्याचे नामांकन करतांना स्थलांतरण प्रमाणपत्र (Migration Certificate) व योग्यता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) विद्यापीठात सादर करणे अनिवार्य आहे.

१२) जे महाविद्यालय संबंधित विद्यार्थ्यांचे स्थलांतरण प्रमाणपत्र (Migration Certificate) विद्यापीठात सादर करणार नाहीत अशा विद्यार्थ्याचे परीक्षा आवेदन पत्र स्विकारण्यात येणार नाही.

( डॉ. जे. व्ही. दडवे)
संचालक,परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी :— १) मा.कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा.कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
३) मा. उपकुलसचिव, विद्या विभाग, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
४) मा.वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली
५) मा.उपकुलसचिव ,महाविद्यालयीन विभाग,गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

उपकुलसचिव (परीक्षा पुर्व)
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली